खालील नमूद केलेल्या स्तोत्र, मंत्र व प्रार्थनांची माहिती निरनिराळ्या धार्मिक पुस्तकातून व इतर सर्वसामान्य जनांसाठी उपलब्ध असलेल्या माहितीस्रोतातून घेतलेली आहे व आवश्यक तेथे स्रोतांचा उल्लेख केलेला आहे. समिती या मंत्र, प्रार्थना व इतर लिखाणाच्या अचूकतेबद्दल, परिणामकारकतेसाठी अथवा पूर्णत्वासाठी जबाबदार नाही. श्री देवी चामुंडेश्वरी समिती ही या माहितीच्या वापराने कोणास काही नुकसान, तोशीस, जीवितहानी, शारीरिक किंवा मानसिक त्रास व जोखीम झाल्यास जबाबदार नाही असा वापर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष, विश्वासाने अथवा पडताळणी करून अथवा न करता केलेला असू शकतो. वाचकांना विनंती करण्यात येते की त्यांनी योग्य अध्यात्मिक अधिकारी व्यक्तीचा सल्ला वा मार्गदर्शन घेऊन या माहितीचा वापर करावा.

# ||श्रीचंडीकवच||

**ॐ अस्यश्रीचण्डीकवचस्यब्रह्माऋषिः, अनुष्टुप्छन्दः, चामुण्डादेवता,**

**अङ्गन्यासोक्तमातरोबीजम्, दिग्बन्ध्देवतास्तत्वम्,**

**श्रीजगदम्बाप्रीत्यर्थे (सप्तशतिपाठाङ्ग) जपेविनियोगः |**

या श्रीचंडीकवचाचे प्रणेते ब्रह्मदेव, छन्द अनुष्टुभ, देवता श्री चामुंडा, अङ्गन्यासोक्तमातरो हे बीज, दिग्बन्ध्देवता हे तत्व व श्री जगदंबादेवीप्रीत्यर्थ (सप्तशतीपाठासाठी) हा विनियोग आहे.

दैनिक उपासने व्यतिरिक्त सप्तशती पाठ करण्याआधी देवीकवचाचा जप केला जातो.

**ॐ नमः चण्डिकायै**

श्री चंडिका देवीला नमस्कार

**मार्कण्डेय उवाच**

मार्कंडेयऋषी (ब्रह्मदेवांना) म्हणाले

**ॐयद्‌गुह्यंपरमंलोकेसर्वरक्षाकरंनृणाम |**

**यन्नकस्यचिदाख्यातंतन्मेब्रूहीपितामह ||१ ||**

हे ब्रह्मन्, या संसार सागरात अत्यंत गुप्त व मनुष्यांची सर्व प्रकारे संरक्षण करणारी, आजवर तुम्ही कोणासही विदित न केलेली साधना मला सांगण्याची कृपा करा.

**ब्रह्मोवाच**

**अस्तिगुह्यतमंविप्रसर्वभूतोपकारकम्|**

**देव्यास्तुकवचंपुण्यंतच्छुणुष्वमहामुने** ||२||

ब्रह्मदेवांनी उत्तर दिले – देवीकवच ही अत्यंत गुप्त, पवित्र, पुण्यकारक व सर्व प्राणिमात्रांना अनुकूल अशी प्रार्थना असून हे महामुने, आपण ती श्रवण करा.

**प्रथमंशैलपुत्रीचद्वितीयंब्रह्मचारिणी।**

**तृतीयंचन्द्रघण्टेतिकूष्माण्डेतिचतुर्थकम्॥३॥**

श्री देवीची नऊ रुपे आहेत ज्यांना नवदुर्गा असे संबोधिले जाते. त्यांची वेगवेगळी नवे आहेत. प्रथम नाव शैलपुत्री तर दुसरे ब्रह्मचारिणी आहे. तिसरे स्वरूप चंद्र घंटा तर चौथे रुप कूष्मांडा आहे.

*शैलपुत्री हे हिमालयाची कन्या पार्वतीचे नाव आहे. हिमालयाच्या तपस्या व प्रार्थनेने प्रसन्न होऊन देवी कन्यारुपाने प्रकट झालीअसे पुराणामध्ये वर्णन आहे.*

***ब्रह्मचारयितुंशीलंयस्या सा ब्रह्मचारिणी*** *– आनंदमय ब्रह्मस्वरूपाची प्राप्ती करून देणारी ती ब्रह्मचारिणी आहे.* ***चन्द्रःघण्टायांयस्यसा*** *– आल्हादकारी चंद्र जिने आपल्या कपाळी धारण केला आहे ती.*

***कुत्सितःउष्माकूष्मा-त्रिविधतापयुक्तसंसारः,***

***सअण्डेमांसपेश्यामुदररुपायामयस्यासाकूष्मांडा–***

*जिच्या मंदहास्यातून ब्रह्माण्डाची निर्मिती झाली व जिने त्रिविधतापयुक्त संसार आपल्या उदरी धारण केला आहे, तिला भगवती कूष्मांडा म्हटले जाते.*

**पञ्चमंस्कन्दमातेतिषष्ठंकात्यायनीतिच।**

**सप्तमम्कालरात्रीतिमहागौरीतिचाष्टमम्॥४॥**

देवीचे पाचवे रुप स्कंदमाता तर सहावे कात्यायनी आहे. सातवे रुप कालरात्रि तर आठवे स्वरूप महागौरी या नावाने प्रसिद्ध आहे.

*भगवान कार्तिकेयाची (स्कंद) माता म्हणून स्कंदमाता हे नाव धारण केले. देवतांचे रक्षण करण्यासाठी महर्षी कात्यायनयांच्या आश्रमात प्रकट झाली व जिचा महर्षींनी कन्या म्हणून स्वीकार केला व जिने पुढे महिषासुराचा वध केला ती कात्यायनी. दुष्ट संहार करणारी व अज्ञानरुपी अंधकाराचा नाश करणारी हे कालरात्रिचे स्वरूप आहे.*

**नवमंसिद्धिदात्रीचनवदुर्गाप्रकीर्तिताः।**

**उक्तान्येतानिनामानिब्रह्मणैवमहात्मना॥५॥**

देवीचे नववे स्वरूपसिद्धी व मोक्ष देणारी सिद्धीदात्री हे आहे. या नवदुर्गांच्या साधनेने (नामजपाने), हे मुने, ब्रह्मप्राप्ती होते.

**अग्निनादह्यमानस्तुशत्रुमध्येगतोरणे।**

**विषमेदुर्गमेचैवभयार्ताःशरणंगतः॥६॥**

जो मनुष्य अग्नि संकटात सापडला असेल व रणभूमीत शत्रूने वेढला गेला असेल अथवा विषम (भयंकर) संकटाने ग्रस्त असेल तर भगवती दुर्गेला शरण जाण्याने भयाचा अंत होतो.

**नतेषांजायतेकिंचित,अशुभंरणसंकटे।**

**नापदंतस्यपश्यामि, शोकदुखःभयंनहि ||७||**

युद्धामध्ये अशा भक्ताचे अशुभ (घात) होत नाही व त्याला आपदांचा सामना करावा लागत नाही. देवीभक्तांना शोक, भय व दुःखापासून त्रास होत नाही.

**यैस्तुभक्त्यास्मृतानूनंतेषांवृद्धिःप्रजायते.।**

**येत्वांस्मरन्तिदेवेशि, रक्षसेतान्नसंशयः ||८||**

ज्यांनी श्रीदेवीचे भक्ती आणि प्रेमपूर्वक स्मरण केले आहे, त्यांचा उत्कर्ष होतो. देवेश्वरी तिच्या नित्य स्मरण करणाऱ्या भक्तांचे निःसंशय रक्षण करते.

**प्रेतसंस्थातुचामुण्डा, वाराहीमहिषासना।**

**ऐन्द्रीगजसमारूढावैष्णवीगरुडासना ||९||**

श्री चामुंडादेवी प्रेतावर आरूढ होते. श्रीवाराही रेड्यावर स्वार होते. श्रीऐंद्रीदेवता ऐरावतावर (हत्तीवर) आरूढ होते तर श्रीवैष्णवीदेवीचे आसन गरुड आहे.

**माहेश्वरीवृषारुढाकौमारीशिखिवाहना** |

**लक्ष्मीःपद्मासनादेवीपद्महस्ताहरिप्रिया** ||**१०**||

श्रीदेवी माहेश्वरी वृषभावर आरूढ आहे व श्रीदेवी कौमारिचे वाहन मयूर (मोर) आहे. भगवान विष्णूंना प्रिय असलेली देवी लक्ष्मी कमळावर विराजमान आहे व तिने आपल्या हातात कमल धारण केले आहे.

**श्वेतरुपधरादेवीईश्वरीवृषवाहना।**

**ब्राह्मीहंससमारूढा, सर्वाभरणभूषिता ||११||**

श्वेतरूपिणी श्रीईश्वरीदेवी बैलावर आरूढ आहे श्रीदेवीब्राह्मी हंसावर बसलेली आहे. या सर्व देवता सर्व प्रकारच्या आभूषणांनी (दागिन्यांनी) युक्त आहेत,

**इत्येतामातरःसर्वाः सर्वयोगसमन्विताः ।**

**नानाभरणशोभाढ्यानानारत्नोपशोभिताः ||१२||**

या सर्व मातृस्वरूपी देवता सर्व योग शक्तीने संपन्न, तसेच अनेक आभूषणे व रत्नांनी सुशोभित आहेत.

**दृश्यन्तेरथमारुढादेव्यःक्रोधसमाकुलः।**

**शङ्खंचक्रंगदांशक्तिंहलंचमुसलायुधम ||१३||**

या सर्व देवता भक्त रक्षणार्थ संतप्त होऊन रथावर आरूढ आहेत आणि त्यांनी शंख, चक्र, गदा, शक्ती, नांगर व मुसळ इत्यादी आयुधे धारण केली आहेत.

**खेटकंतोमरंचैवपरशुंपाशमेवच |**

**कुन्तायुधंत्रिशूलंचशार्ङ्गमायुधमुत्तमम् ||१४||**

या देवतांनी खेटक (ढाल), तोमर (पहार), परशु (कुऱ्हाड), तसेच पाश (नाग) इत्यादी तेजस्वी शस्त्रे तसेच त्रिशूल, धनुष्यबाणही आयुधे धारण केलेली आहेत.

**दैत्यानांदेहनाशायभक्तानांअभयायच |**

**धारयन्त्यायुधानीत्यंदेवानांचहितायवै ||१५||**

दैत्यांचा शरीरनाश, भक्तांना अभय देणे व देवांचे कल्याण करणे हा त्यांच्या शस्त्रधारणेचा उद्देश आहे.

**नमस्तेऽतुमहारौद्रेमहाघोरपराक्रमे |**

**महाबलेमहोत्साहेमहाभयविनाशिनी ||१६||**

हे देवी, तू महानरौद्ररूपी, घोर पराक्रमी, महान बळ धारण करणारी, सदैव उत्साही आणि महाभयाचा विनाश करणारी आहेस. (आम्ही तुला नमस्कार करतो)

**त्राहिमामदेवीदुष्प्रेक्ष्येशत्रूनामभयवर्धिनि |**

**प्राच्यांरक्षतुमामैन्द्रीआग्नेय्यामग्निदेवता||१७||**

जिच्याकडे पाहणे ही कठीण आहे अशा शत्रूंच्या मनात भीती उत्पन्न करणाऱ्या देवते, माझे रक्षण कर. पूर्व दिशेकडून येणाऱ्या संकटापासून देवी ऐंद्री व आग्नेय दिशेकडून येणाऱ्या संकटापासून अग्निदेवता माझे रक्षण करो.

**दक्षिणेऽवतुवाराहीनैऋत्याखड्गधारिणी |**

**प्रतीच्यांवारुणीरक्षेद्वायव्यांमृगवाहिनी ||१८||**

दक्षिण दिशेकडून देवी वाराही तर नैऋत्य दिशेकडून देवी खड्गधारिणी माझे रक्षण करो. पश्चिम दिशेकडून वारुणी व वायव्येकडून देवी मृगवाहिनी माझे रक्षण करो.

**उदीच्यांपातुकौमारीऐशान्यांशूलधारिणी |**

**ऊर्ध्वंब्रह्माणिमेरक्षेदधस्तादवैष्णवीतथा ||१९||**

उत्तरदिशेकडून देवी कौमारी आणि ईशान्यदिशेकडून देवी शूलधारिणी माझे रक्षण करो. ऊर्ध्व दिशेकडून देवी ब्रह्माणी व अधर दिशेकडून देवी वैष्णवी माझे रक्षण करो.

**एवंदशदिशोरक्षेत्चामुण्डाशववाहना |**

**जयामेचअग्रतःपातु, विजयापातुपृष्ठतः ||२०||**

प्रेतावर स्वार होणारी देवी चामुण्डा सर्व दिशानी माझे रक्षण करो.

देवी जया समोरून तर देवी विजया पाठीकडून माझे रक्षण करो.

**अजितावामपार्श्वेतुदक्षिणेचअपराजिता।**

**शिखामुद्योतिनिरक्षेदुमामूर्ध्निव्यवस्थिता।।२१।।**

देवी अजिता डावीकडून तर देवी अपराजिता माझे उजवीकडून रक्षण करो. देवी उद्योतिनी शिखेचे तर देवी उमा माझ्या मस्तकी स्थिर होऊन माझे संरक्षण करो.

**मालाधरीललाटेचभ्रुवौरक्षेद्यशस्विनी।**

**त्रिनेत्राचभ्रुवोर्मध्येयमघण्टाचनासिके।।२२।।**

देवी मालाधारी ललाटाचे तर यशस्विनी देवी भुवयांचे रक्षण करो. देवी त्रिनेत्रा भुवयांच्या मध्यभागाचे व देवी यमघंटा नाकपुड्यांचे रक्षण करो.

**शङ्खिनीचक्षुषोर्मध्येश्रोत्रयोद्वारवासिनी।**

**कपोलौकालिकारक्षेत्, कर्णमूलेतुशाङ्करी।।२३।।**

दोन्ही नेत्रांच्या मध्यभागाचे रक्षण देवी शंखिनी व कानांचे रक्षण द्वारवासिनी करो. देवी कालिका कपाळाचे व शांकरी कानांच्या पाळ्यांचे रक्षण करो.

**नासिकायांसुगन्धाचउत्तरोष्ठेचचर्चिका** ।

**अधरेचअमृतकलाजिव्हायान्चसरस्वती** ।।**२४**।।

नाकाचे रक्षण देवी सुगंधा व वरच्या ओठाचे रक्षण देवी चर्चिका करो. अधरोष्ठाचे रक्षण देवी अमृतकला तर जिभेचे रक्षण देवी सरस्वती करो.

**दन्तानरक्षतुकौमारीकण्ठदेशेतुचण्डिका** ।

**घण्टिकांचित्रघण्टाचमहामायाचतालुके** ।।**२५**।।

देवी कौमारी माझ्या दातांचे व चंडिका कंठभागाचे रक्षण करो. गळ्याच्या घाटीची देवी चित्रघण्टा तर टाळ्याची देवी महामाया रक्षण करो.

**कामाक्षीचिबुकंरक्षेद्वाचंमेसर्वमङ्गला** ।

**ग्रीवायांभद्रकालीचपृष्ठवंशेधर्नुधरी** ।।**२६**।।

श्रीदेवी कामाक्षी माझ्या हनुवटीचे तर देवी सर्वमंगला माझ्या वाणीचे (वाचेचे) रक्षण करो. देवी भद्रकाली माझ्या मानेचे तर देवी धर्नुधरी माझ्या मेरुदंडाचे (पाठीचे) संरक्षण करो.

**नीलग्रीवाःबहिःकण्ठेनलिकांनलकूबरी** ।

**स्कन्धयोखड्गिणिरक्षेद्बाहूमेवज्रधारिणी** ।।**२७**।।

गळ्याच्या बाहेरील भागाचे नीलग्रीवा तर श्वासनलिकेचे नलकुबरी रक्षण करो. माझ्या खांद्यांचे खड्गिणि तर बाहूंचे वज्रधारिणी रक्षण करो.

**हस्तयोर्दण्डिनीरक्षेदम्बिकाचाङ्गुलीषुच** ।

**नखान्शूलेश्वरिरक्षेत्कुक्षौरक्षेत्कुलेश्वरी** ।।२८।।

माझ्या दोन्ही हातांचे रक्षण देवी दंडिणी तर बोटांचे रक्षण देवी अंबिका करो. देवी शूलेश्वरी नखांचे तर देवी कुलेश्वरी पोटाचे रक्षण करो.

**स्तनौरक्षेत्महादेविमनःशोकविनाशिनी** ।

**हृदयेललितादेवीउदरेशूलधारिणी** ।।२९।।

वक्षभागाचे रक्षण महादेवी, व मनाचे रक्षण देवी शोकविनाशिनी करो. हृदयाचे रक्षण ललितादेवी आणि देवी शूलधारिणी उदरात स्थित होऊन माझे रक्षण करो.

**नाभौचकामिनीरक्षेद्गुह्यंगुह्येश्वरीतथा ।**

**पूतनाकामिकामेढ्रंगुदेमहिषवाहिनी ।।३०।।**

नाभीचे रक्षण देवी कामिनी व गुह्यभागाचे रक्षण देवीगुह्येश्वरी करो. पूतना व कामिका लिंगाची व महिषवाहिनी गुदाचे रक्षण करो.

**कट्यांभगवतीरक्षेज्जानुनीविन्ध्यवासिनी ।**

**जङ्घेमहाबलारक्षेत्सर्वकामप्रदायिनी ।।३१।।**

श्रीदेवी भगवती माझ्या कटिभागाची (कंबर) व देवी विंध्यवासिनी माझ्या गुडघ्यांचे रक्षण करो. सर्व इच्छांची पूर्ती करणारी देवी महाबला माझ्या मांड्या व पोटऱ्यांचे रक्षण करो.

**गुल्फयोर्नारसिंहिच, पादपृष्ठेतुतैजसी ।**

**पादांगुलीषुश्रीरक्षेत्पादाधस्तलवासिनि ।।३२।।**

देवी नारसिंही माझ्या पायांच्या घोटयांची व तेजसी देवी माझ्या पावलांच्या पृष्ठभागाची रक्षा करो. देवी श्रीपायांच्या बोटांची व देवी तलवासिनी पायांच्या तळव्यांचे रक्षण करो.

**नखान्दन्ष्ट्राकरालीचकेशांचैवउर्ध्वकेशिनि।**

**रोमकूपेषुकौबेरीत्वचंवागीश्वरीतथा।।३३।।**

आपल्या विक्राळ दातांनी भयंकर दिसणारी देवी दंष्ट्राकराली माझ्या नखांचे रक्षण करो. देवी ऊर्ध्वकेशिनी माझ्या केसांचे रक्षण करो. देवी कौबेरी माझ्या त्वचेवरील छिद्रांचे व देवी वागीश्वरी त्वचेचे रक्षण करो.

**रक्तमज्जावसामांसान्यस्थिमेदांसिपार्वति।**

**आन्त्राणिकालरात्रिचपित्तंचमुकुटेश्वरी।।३४।।**

देवी पार्वती (माझ्या) रक्त, मज्जा, चरबी, मांस, अस्थी तसेच मेदाचे रक्षण करो. माझ्या आतड्यांचे देवी कालरात्री तसेच पित्ताचे देवी मुकुटेश्वरी रक्षण करो.

**पद्मावतीपद्मकोशेकफ़ेचूडामणिस्तथा |**

**ज्वालामुखीनखज्वालामअभेद्यासर्वसन्धिषु ||३५||**

मूलाधारचक्रातील कमलकोशाचे देवी पद्मावती रक्षण करो. देवी चूडामणी कफापासून होणाऱ्या रोगांपासून रक्षण करो. माझ्या नखांच्या तेजाचे देवी ज्वालामुखी व जिचा कोणतेही अस्त्र भेद करू शकत नाही अशी अभेद्या देवी माझ्या शरीरातील सर्व सांध्यांचे रक्षण करो.

**शुक्रंब्रह्माणिमेरक्षेत्, छायांछत्रेश्वरीतथा |**

**अहंकारंमनोबुद्धिंरक्षेन्मेधर्मधारिणी ||३६||**

श्री ब्रह्माणी वीर्याचे (पुनरुत्पादन शक्ती) व देवी छत्रेश्वरी सावलीचे रक्षण करो. श्रीधर्मधारिणी माझ्या मन, बुद्धी, अहंकार इत्यादींचे रक्षण करो.

**प्राणापानौतथाव्यानमुदानंचसमानकम् |**

**वज्रहस्ताचमेरक्षेत्प्राणंकल्याणशोभना ||३७||**

हातात वज्रधारण करणारी देवी वज्रहस्ता माझ्या शरीरातील प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान या (पचनशक्तीशी संबंधित) वायूंचे रक्षण करो. देवी कल्याण शोभना माझ्या प्राणांचे रक्षण करो.

**रसेरुपेचगंधेचशब्देस्पर्शेचयोगिनी |**

**सत्वंरजस्तम्चैवरक्षेत्नारायणिसदा ||३८||**

माझ्या रस, रूप, गंध, शब्द व स्पर्श अनुभवण्याच्या शक्तीचे योगिनी देवी रक्षण करो. माझ्या सत्व, रज व तमगुणांचे देवी नारायणी रक्षण करो.

**आयुरक्षतुवाराही, धर्मंरक्षतुवैष्णवी |**

**यशःकीर्तिंचलक्ष्मीचधनंविद्यांचचक्रिणी ||३९||**

देवी वाराही माझ्या आयुष्याचे रक्षण करो व देवी वैष्णवी माझ्यातील धर्मप्रवृत्तीचे रक्षण करो. देवी चक्रिणी यश, कीर्ती, लक्ष्मी, धन व विद्येचे रक्षण करो.

**गोत्रमिन्द्राणिमेरक्षेत्पशून्मेरक्षचण्डिके |**

**पुत्रान्रक्षेमहालक्ष्मी, भार्यांरक्षतुभैरवी ||४०||**

माझ्या गोत्राचे (वंशाचे) रक्षण देवी इंद्राणी करो, माझ्या पशुधनाचे रक्षण देवी चंडिका करो. देवी महालक्ष्मी माझ्या पुत्राचे व भैरवी पत्नीचे रक्षण करो.

**पन्थानंसुपथारक्षेन्मार्गंक्षेमकरीतथा |**

**राजद्वारेमहालक्ष्मींविजयासर्वतःस्थिता ||४१||**

देवी सुपथा माझ्या प्रवासात तर देवी क्षेमकरी मार्गात माझे रक्षण करो. राजदरबारी देवी महालक्ष्मी तर सर्वव्याप्त विजयादेवी सर्व भयापासून माझे रक्षण करो.

**रक्षाहीनंतुयत्स्थानंवर्जितंकवचेनतु |**

**तत्सर्वंरक्षमेदेविजयन्तिपापनाशिनी ||४२||**

ज्या अवयवांचा वा शरीराच्या अंगांचा उल्लेख आतापर्यंत या देवी कवचात केलेला नाही त्या सर्वशरीर भागांचे रक्षण पापांचा नाश करणारी देवी जयंती करो.

**पदमेकंनगच्छेत्त्तुयदिच्छेच्छुभामात्मनः |**

**कवचेनावृतोनित्यंयत्रयत्रैवगच्छति ||४३||**

भक्ताने नेहमी कवच पठण करून यात्रा करावी. स्वसुरक्षिततेसाठी भक्ताने कवच पठणाशिवाय पदक्रमणा करू नये व नित्यदेवी कवचाचे पठण करावे.

**तत्रतत्रार्थलाभश्च्चविजयःसर्वकामिकः |**

**यंयंचिंतयन्त्येकामंतंतंप्राप्नोतिनिश्चितं ||**

**परमेश्वर्यमतुलमप्राप्स्यतेभूतलेपुमान ||४४||**

देवी कवच पठणाद्वारा कृपा प्राप्त झालेली व्यक्ती जिथे जिथे जाते, तेथे तिला अर्थलाभ होतो व तिच्या इच्छित कामना पूर्ण होऊन विजय प्राप्ती होते. असा भक्त महान ऐश्वर्य प्राप्त करतो.

**निर्भयोजायतेमर्त्यः, संग्रामेष्वपराजितः |**

**त्रैलोक्येतुभवेत्पूज्यःकवचेनावृतःपुमान् ||४५||**

देवीकवच पठणाने मनुष्य निर्भय होऊन युद्धात (संग्राम) अपराजित राहतो. असा भक्त त्रैलोक्यात पूजनीय होतो.

**इदंतुदेव्याः कवचंदेवानामपिदुर्लभम् |**

**यःपठेत्प्रयतोनित्यंत्रिसंध्यंश्रद्धयान्वितः ||४६||**

हे देवीकवच देवांनाही दुर्लभ आहे. श्रद्धाळू भक्तांनी याचे त्रिकाळी (सकाळ, माध्यान्ह व सायंकाळ) पठण करावे.

**दैवीकलाभवेत्तस्यत्रैलोक्येष्वपराजितः |**

**जीवेद्वर्षशतंसाग्रमपमृत्युविवर्जितः ||४७||**

असा भक्त दैवीकृपेला प्राप्त होऊन त्रैलोक्यामध्ये कुठेही पराजित होत नाही. इतकेच नव्हे तर शतवर्ष आयुष्य प्राप्ती होऊनअपमृत्यूपासूनसंरक्षणहोते.

**नश्यन्तिव्याधयःसर्वेलूताविस्फोटकादयः |**

**स्थावरंजंगमंचैवकृत्रिमंचापियद्विषं ||४८||**

फोड, कोड वा त्वचेवरील व्रण इत्यादी व्याधी नष्ट होतात. स्थावर (अफू/धत्तुरा) अथवा जंगम (सर्प/विंचू) आदिपासून होणाऱ्या विषबाधेपासून सुटका होते.

**अभिचाराणिसर्वाणिमन्त्रयन्त्राणिभूतले |**

**भूचराःखेचराश्चैवजलजाश्चोपदेशिकाः ||४९||**

या जगतातील जारण मरण इत्यादी मंत्रविद्येपासून होणारे त्रास दूर होतात. भूतल, आकाश तसेच जलातील अनिष्ट शक्तींपासून संरक्षण होते.

**सहजाकुलजामालाडाकिनीशाकिनीतथा |**

**अन्तरिक्षचराघोराडाकिन्यश्च्यमहाबलाः ||५०||**

कुळाला बाधक तसेच माला, शाकिनी, डाकिनी अंतरिक्षात फिरणाऱ्या अनिष्ट शक्तींपासून देवी कवच संरक्षण करते.

**ग्रहभूतपिशाचाश्च्चयक्षगन्धर्वराक्षसाः |**

**ब्रह्मराक्षसवेतालाःकूष्माण्डाः भैरवादयः ||५१||**

अनिष्ट ग्रह, भूत, पिशाच्च तसेच यक्ष, गंधर्व, राक्षस, वेताळ, कूष्मांड व भैरवासारख्या इतर योनीतील अनिष्ट शक्तींपासून देवी कवच संरक्षण करते.

**नश्यन्तिदर्शनात्तस्यकवचेहृदिसंस्थिते |**

**मानोन्नतिर्भवेदराज्ञस्तेजोवृद्धिकरंपरम् ||५२||**

कवचधारी व्यक्तीचा राजशक्तीकडून सन्मान केला जातो तसेच नित्यकवच पठण व्यक्तीला तेजस्वी करते.

**यशसावर्धतेसोऽपिकीर्तिमण्डितभूतले |**

**जपेत्सप्तशतींचण्डींकृत्वातुकवचंपुरा ||५३||**

जो भक्त कवचपठणासहित चंडी व सप्तशती पाठ करतो, त्या कवच पठण करणाऱ्या व्यक्तीची कीर्ती वृद्धिंगत होते व त्यास यश प्राप्ती होते.

**यावदभूमण्डलंधत्तेसशैलवनकाननम्** |

**तावत्तिष्ठतिमेदिन्यांसंततिःपुत्रपौत्रिकी** ||**५४**||

त्याची जोपर्यंत वन, पर्वत, अरण्यासहित पृथ्वी राहील तोपर्यंत पुत्र, पौत्र इत्यादी संतान परंपरा अबाधित राहील.

**देहान्तेपरमंस्थानयत्सुरैरपिदुर्लभम्** |

**प्राप्नोतिपुरुषोनित्यंमहामायाप्रसादतः** ||**५५**||

श्रीमहामायेच्या प्रसादाने देह त्याग केल्यावर अशा भक्ताला देवांनाही दुर्लभ असलेले परमपद प्राप्त होते.

**लभतेपरमंरूपंशिवेनसहमोदते||ॐ|| ||५६||**

**इतिदेव्याकवचंसंपूर्णम् ।**

अशा भक्ताला देवीकृपेने दिव्य देह प्राप्ती होऊन आनंदमयी शिवलोक प्राप्ती होते.

**–समाप्त–**


संदर्भसूची : www.prabhatkhabar.com

www.speakingtrea.in

www.bhaktiyogdarshan.com

www.aranyadevi.com

पंडित रामनारायणदत्त शास्त्री पांडे, गीता प्रेस, गोरखपूर यांनी केलेला हिंदी अनुवाद


***********************************